# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट ४३४- २३** **दिनांक : - २१/१२/२०२३**

## "नोव्हेंबर" महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

१) अ.मृ. चे तपासावरुन नायगाव पोलीस ठाणे गु. रजी. नं. ४१०/२०२३ भादविस कलम ३०२,२०१ प्रमाणे दिनांक २४/११/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.सदर गंभीर स्वरुपाचा खुनाचा गुन्हा केल्यानंतर अज्ञात आरोपीने पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने निर्जन स्थळी टाकलेल्या मयताचे प्रेत पुर्णपणे कुजुन व सडून शरिरावरिल त्वचा गळुन हाडांचा सापळा दिसत असलेल्या अवस्थेत सापडलेल्या मयताची ओळख पटविणे आणि मारेक-यांचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणणे हे मि.भा.व.वि. पोलीसांसमोर मोठे आव्हान होते. दाखल निर्घृण खुनाचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत मा. वरीष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक- शाहुराज रणवरे नेम- गुन्हे शाखा कक्ष - २ वसई यांनी वेगवेगळी पथके तयार करुन मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मनुष्य मिसींग चेक केल्या गेल्या. तसेच वसई, विरार, नालासोपारा, मुंबई, ठाणे परीसरात मयताचे फोटो व त्यांचे अंगावरील कपडे चिजवस्तु यांची भित्तीपत्रके बनवुन ते सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करण्यात आली होती. त्यावेळी नायगाव पोलीस ठाणे मनिष्य मिसिंग रजि नं ७२/२०२३ मधील मिसिंग लवेश रमेश माळी वय २३ वर्ष रा. बीबी पाडा, कामण स्टेशन, कामण चौकीच्या मागे, नायगाव पुर्व ही व्यक्ती दिनांक ०८/११/२०२३ रोजी पासुन मिसिंग असल्याची माहीती प्राप्त झाली. सदर मिसिंग व्यक्तीचे अंगावरील कपडे व त्याचे मिसिंग होण्याचा कालावधी हे मयत इसमाचे कपडे व मरणाचे कालावधीशी मिळते-जूळते असल्याने सदर मयत इसमाचे प्रेतावरील कपडयांवरुन मयत इसमाची त्याचे नातेवाईकांकरवी ओळख पटविण्यात आली. सदर मयत व्यक्तीस अंमलीपदार्थाचे सेवनाची सवय असल्याने त्याचे सोबत नशा करणारे व्यक्तींबाबत तपास करुन त्यांची माहीती प्राप्त करण्यात आली. त्याच दरम्यान गुप्त बातमीदाराकरवी मयत लवेश रमेश माळी याचा त्याचे सोबत नशा करणारे मित्रांनीच ठार मारल्याची माहीती प्राप्त झाली. त्या अनुषंगाने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार इसम वय ५० वर्ष रा. बाफाने चौकीच्या बाजुला, नायगाव पुर्व यास विश्वासात घेवून त्याचेकडे गुन्हयाचे बाबत चौकशी करुन खालील आरोपीतांची नाव निष्पन्न करण्यात आली.

<u>आरोपीतांची नावे पत्ते :-</u>

१) एक पुरुष इसम वय ३० वर्ष रा. शांती गोविंद मार्ग आनंद निवासच्या बाजूला चंद्रपाडा, नायगाव
२) एक पुरुष इसम वय ३० वर्ष रा. बाफाने प्रविण पेंटरच्या जवळ, नायगाव पुर्व
३) एक विधीसंर्घषग्रस्त बालक रा. काशिमिरा

वरील प्रमाणे आरोपीतांची नावे निष्पन्न झाल्यानंतर सदर आरोपीतांचा शोध घेवून त्यापैकी आरोपीत एक पुरुष इसम वय ३० वर्ष रा. शांती गोविंद मार्ग आनंद निवासच्या बाजूला चंद्रपाडा, नायगाव यास ताब्यात घेण्यात आले. आरोपीताकडे गुन्हयाचे घडले प्रकाराबाबत कसुन चौकशी केली असता दिनांक ०८/११/२०२३ रोजी सदर गुन्हयातील मयत लवेश रमेश माळी याने ताब्यातील आरोपीत याची ॲटोरीक्षा क्रमांक एमएच/४८/बीएफ/२१३८ ही चालविताना ती डंपरला मागुन ठोकल्याने रीक्षाची काच फुटल्याने नुकसान केल्याने आरोपीताचा मयतावर राग होता. त्यानंतर मयत यांनी गुन्हयातील तिनही आरोपीत आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचेसोबत झोपडीमध्ये एकत्र नशा केली

त्यावेळी विधीसंर्घषग्रस्त बालक याचे खिशातुन मयत लवेश रमेश माळी याने ५०००/-रुपये चोरल्याचा संशय घेवून वरील आरोपीत व विधीसंर्घषग्रस्त बालक यांनी मिळुन मयत यास ठोश्याबुक्कयांनी मारहाण करुन डोक्यात दगड घालून जिवे ठार मारुन त्याचे प्रेत पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने बाजुच्या झाडीझुडपात फेकुन दिले असल्याचे कबुल केले आहे.

सदरची कामगिरी करणारे नायगाव पोलीस ठाणेचे वपोनि रमेश भामे, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक पो.नि. शाहुराज रनवरे, नायगाव पोलीस ठाण्याचे पो.नि.सागर टिळेकर, स.पो.नि. सुहास कांबळे (गुन्हे शाखा-२), सागर प्रकाश शिंदे (गुन्हे शाखा-२), गणेश केकान(नायगाव पोस्टे), रोशन देवरे (नायगाव पोस्टे), स.फौ.रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. रविंद्र पवार, प्रफुल्ल पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, दादा आडके, सुधीर नरळे, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अं. अमोल कोरे, म.सु.ब. केकान,चौधरी सर्व नेम- गुन्हे शाखा-२ वसई तसेच नायगाव पोलीस ठाण्याचे पो.अं. सचिन खटाळ, चेतन ठाकरे, अमर पवार, जयवंत खांडवी, सचिन मोहीते यांचा दिनांक २१/१२/२०२३ रोजी मा. मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"नोव्हेंबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल" क्रमांक-१ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




**मा.पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि.श्री. शाहुराज रनवरे**

२) विरार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक- ३१/१०/२०२३ रोजी पहाटे ०६:२०वा.चे सुमारास म्हाडा कॉलनी, विरार(प.), येथील जकात नाका ते नालासोपारा रोडवरील यशवंत सर्कल जवळून तक्रारदार महिला हया नालासोपारा बाजुकडे पायी चालत जात असतांना, अचानक त्यांचे पाठीमागुन दोन अनोळखी इसम त्यांचे ताब्यातील मोटर सायकलवर येवुन, तक्रारदार यांचे हातातील एम.आय.कंपनीचा रेडमी नोट-५ प्रो मॉडेलचा मोबाईल फोन जबरीने हिसकावुन घेवुन, चोरी करुन चोरुन नेले बाबत तक्रारदार- **सौ.पल्लवी दिपक गायकवाड, वय-३० वर्षे,** व्यवसाय-नोकरी, रा.राजोडी बिच, विरार(प.), ता.वसई, जि.पालघर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतांवर विरार पो.स्टे. गु.रजि.नं. १०३०/२०२३, भा.दं.वि.सं.कलम-३९२, ३४ प्रमाणे दि.३१/१०/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

नमुद गुन्हयाचे अनुषंगाने विरार गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन, घटना ठिकाणचे सी.सी.टी.व्ही. फुटेजचे परिक्षण करुन, तांत्रिक व गुप्त बातमीदार यांचे मार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीत नामे. **१)अजित कनोजिया, वय-२३ वर्षे, २)अशरफ शेख, वय-२४ वर्षे,** दोन्ही रा.अलकापुरी रोड, नालासोपारा(पु.), ता.वसई हे मिळुन आले. नमुद

आरोपीतांकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता,त्यांचा सदर गुन्हातील सहभाग निषन्न झाल्योन त्यांना दि.३१/१०/२०२३ रोजी नमुद गुन्हयात अटक केली आहे. सदरचा गुन्हयातील अनोळखी आरोपीतांचा शोध घेवुन, निष्पन्न करुन, त्यांस अवघ्या १२ तासांचे आत अटक करुन गुन्हयाची उकल केली आहे. नमुद आरोपीतांकडे अधिक तपास केला असता, त्यांचेकडून वेगवेगळया कंपन्यांचे **एकुण-०६ मोबाईल फोन** व **०३ मोटर सायकल** असा **एकुण-१,६१,५००/- रुपये किंमतीचा १०० टक्के मुद्देमाल हस्तगत** करण्यात आला आहे. नमुद आरोपीत यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहे.

| अ.क्रं. | पोलीस ठाणे | गु.रजि.नं. व कायदा कलम |
|---|---|---|
| १ | विरार | १०३०/२०२३, भा.दं.वि.सं.कलम-३९२, ३४ प्रमाणे **(मुळ गुन्हा)** |
| २ | विरार | १०२९/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३९२, ३४ प्रमाणे |
| ३ | विरार | १०३१/२०२३, भा.दं.वि.सं. कलम-३९२, ३४ प्रमाणे |
| ४ | विरार | १०३२/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३९२, ३४ प्रमाणे |
| ५ | विरार | १००१/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे |
| ६ | अर्नाळा सागरी | ३५४/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३९२, ३४ प्रमाणे |
| ७ | तुळींज | ७८१/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३९२, ३४ प्रमाणे |
| ८ | तुळींज | ४४३/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे |
| ९ | नवघर | ६६४/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे |

सदरची कामगिरी करणारे वविरार पोलीस ठाणेचे श्री.राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि.ज्ञानेश फडतरे, पो.हवा.सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, योगेश नागरे, पो.अं.संदिप शेळके, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार, तसेच पो.हवा.नामदेव ढोणे व पो.अं.सोहेल शेख, नेम.पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ ३ यांचा दिनांक २१/१२/२०२३ रोजीच्या मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ नोव्हेंबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक-२ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना व.पो.नि श्री. राजेंद्र कांबळे**

३) काशिमीरा पोलीस ठाणे गु.र.नं. ७४६/२०२३ भा.द.वि.सं.क.३६४ अ,५०६,३४  सादर गुन्हा गंभीर स्वरुपाचा असुन नमुद गुन्हाची माहीती पोलीस ठाण्यात मिळाताच नियंत्रण कक्ष येथे माहीती देवुन पोलीस ठाणे हद्दीत नाकाबंदी करण्यात आली बीट मार्शल पोलीस अधिकारी यांचे पथक तयार करण्यात आले.अपहरीत इसमाचे मोबाईल चे तांत्रीक विश्लेषण करुन तो शिर्डी येथे असल्याची माहीती मिळाल्याने  शिर्डी येथे पथक पाठवुन स्थानिक पोलीसांची मदत घेवुन अपहरीत इसमाचा शोध घेत असताना अपहृत इसम व त्याचे सोबत ४ इसम दिसुन आले त्यावेळी ते पळुन जावु लागले पोलीसांनी पाठलाग करुन ४ आरोपीपैकी मुख्य आरोपी नामे तौफिक सत्तार शेख यास ताब्यात घेतले.तसेच अपहरीत इसमास ताब्यात घेवुन त्यांचे नातेवाईकांच्या ताब्यात दिले.मुख्य आरोपीत याचेकडे तपासात इतर ४ पाहिजे आरोपीचे नावे निष्पन्न करण्यात आले असुन गुन्हात वापरलेले वाहन हस्तगरत करण्यात आले आहे.अटक  आरोपीत याचेवर अहमदनगर जिल्हातील व पुणे जिल्हातील विविध पोलीस ठाण्यात ८ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी करणारे श्री. संदिप कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशमीरा पोलीस ठाणे, पोनि समीर शेख, सपोनि योगेश काळे, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, स.फौ. अनिल पवार, पो.हवा. प्रतापनेताजी पाचुंदे, राहुल सोनकांबळे, निलेश शिंदे, स्वप्निल मोहीले, सतिश निकम, महेश इंगळे, पो.अं. प्रविण टोबरे, किरण विरकर, राजेंद्र सुर्यवंशी, नेमणुक कशमीरा पोलीस ठाणे तसेच पोहवा जयप्रकाश जाधव नेम.पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ १ यांचा दिनांक २१/१२/२०२३ रोजीच्या मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये  **“ नोव्हेंबर  महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक-२ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि श्री.संदिप कदम**

४)   तुळींज पोलीस ठाणे गु.रजी. नं. ८३४/२०२३ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोवैद्यानिक परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (एनडीपीएस ॲक्ट) कलम ८ (क), २१ (क)  २९  प्रमाणे मध्ये ०३ नायजेरियन इसम नामे,१) ONYEKOSI CHIBUZO DAKLANE- AGE-38 2) NWAOBASI CHIBUEZE- AGE-38 3) ONYE IKENNA BENNTH- AGE-36 यांचे अंगझडतीमध्ये एकूण ५५,४०,२००/- रूपये किमतीचा ५५४.०२ ग्रॅम वजनाचा एम.डी.(मेफेड्रॉन)  नावाचा अंमली पदार्थ तसेच ५२,०००/- रूपये किंमतीचा २.६३० किलोग्रॅम वजनाचा गांजा अंमली पदार्थ असा एकुण ५५,९२,२००/- रूपयांचा अंमली पदार्थ मिळून आला म्हणुन गुन्हा.

सदरची कामगिरी करणारे तुळींज पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर, पो.नि.चव्हाण, स.पो.नि. म्हात्रे, पाटील, पो.उप.निरी. केंगार, बांदल, पो.हवा. केंद्रे, गायकवाड, वरठा, पो.अं. छपरीबन, झांझुर्णे, पिंगळे, हाके,कदम, सगळे, म.पो.हवा.मेहेर, म.सु.ब. मुंडे, म.म.सु.ब. अहिरे यांचा **“नोव्हेंबर**

महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-१ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना व.पो.नि. श्री. शैलेंद्र नगरकर**

४) विरार पोलीस ठाणे हद्दीत दि.२१/०९/२०२३ रोजी १५:१५ वा. ते १५:३० वा.चे दरम्यान पंचामृत हॉटेल जवळ, बाजार वार्ड, विरार पुर्व येथे तक्रारदार श्री.नरेश दत्तु पाटील, वय-६२ वर्षे, रा.मु.फणसपाडा, पो.दहिसर, ता.वसई, जि.पालघर हे रोडचे कडने पायी चालत जात असतांना दोन अनोळखी इसमांपैकी एकाने फिर्यादी यांचे मनगटाला पकडुन 'काय मला ओळखत नाही का ?' असे बोलुन फिर्यादी यांना बोलण्यात गुंतवुन गळयातील २० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन व पॅंटचे खिशातील पॉकेट काढुन त्यातील ४,०००/- रुपये रोख रक्कम असे हातचलाखीने काढुन घेऊन, फिर्यादी यांची फसवणुक करुन घेऊन गेले बाबत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे गु.रजि.नं. ९०४/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ४२०, ३४ प्रमाणे दि.२१/०९/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमेरा फुटेजची पडताळणी केली असता, त्यामध्ये सदरचा गुन्हा सराईत आरोपी-विजय तांबे याने केल्याचे निष्पन्न झाल्याने, नमुद आरोपीताचा तांत्रिक माहीती व गुप्त बातमीदारा मार्फत शोध घेत असतांना, गुन्हे प्रकटीकरण पथकास बातमीदाराद्वारे मिळालेल्या माहितीच्या आधारे सराईत आरोपीत नामे.१)**विजय दत्ताराम तांबे, वय-५४ वर्षे**, रा.रोहीदास नगर शेलार गाव, भिवंडी, ता.भिवंडी, जि.ठाणे, २)**अजय अशोक सावंत, वय-५० वर्षे**, रा.रुम नं.३०६, तिसरा माळा, बिल्डींग नं.२१, लल्लु भाई कंम्पाऊंड, गोवंडी, मानखुर्द, मुंबई सापळा रचुन ताब्यात घेवुन, सदर गुन्हयात अटक केली आहे. नमुद आरोपीत यांचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता, त्यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहे.

| अ.क्रं. | पोलीस ठाणे | गु.रजि.नं. व कायदा कलम |
|---|---|---|
| १ | विरार | I ९०४/२०२३, भा.दं.वि.सं.कलम-४२०,३४ प्रमाणे **(मुळ गुन्हा)** |
| २ | शिवाजीनगर, ठाणे शहर | I ४६४/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ४२०, ३४ प्रमाणे |
| ३ | मध्यवर्ती, ठाणे शहर | I ६०५/२०२३, भा.दं.वि.सं. कलम-४२०, ३४ प्रमाणे |
| ४ | चुनाभट्टी, मुंबई शहर | I २३०/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ४२०, ३४ प्रमाणे |
| ५ | कस्तुरबा सब, मुंबई शहर | I ४११/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ४२०, ३४ प्रमाणे |

सदरची कामगिरी करणारे विरार पोलीस ठाणेचे श्री.राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि.ज्ञानेश फडतरे, पो.हवा.सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील,

संदिप शेरमाळे, योगेश नागरे, पो.अं. संदिप शेळके, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार व पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ कार्यालयाचे पो.हवा. नामदेव ढोणे, व पो.अं.सोहेल शेख **"नोव्हेंबर महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-२ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना व.पो.नि. श्री. राजेंद्र कांबळे**

६) विरार पोलीस स्टेशन गु रजि. क्र. ८६९/२०२३ भादविसंक ३९२,३४ प्रमाणे दाखल असुन गुन्हयाचा समांतर तपास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेकडुन सुरु होता.मोबाईल फोन व गॅस बाटले चोरी करणारा एक इसम नालासोपारा पुर्व बिलाल पाडा येथे चोरीचे मोबाईल फोन व गॅस बाटले विक्री करात असल्याची माहीती मिळाल्याने सदर इसमांना सापळा रचुन त्यांना ताब्यात घेवुन त्याचे अंगझडतीमध्ये मोबाईल फोन व बाजुला गॅस बाटला मिळुन आला आरोपीकडे तपास केला असता त्याचेकडुन आयुक्तालयातील जबरी चोरीचे २ व चोरीचे ४ असे ६ गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कामगिरी करणारे मध्यवर्ती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राहुलकुमार राख,स.पो.नि. दत्ताजय सरक,, स.फौ. श्रीमंत जेधे, पो.हवा,मनोहर तावरे, राजविर संधु, संग्राम गायकवाड, राजाराम काळे, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, प्रविणराज पवार, सतिष पवार, महेश वेल्हे,सतिष जगताप,राजविरसिंग संघु, अनिल नागरे, आसिफ मुल्ला, म.सु.ब. सचिन चौधरी तसेच सफौ चव्हाण नेम.सायबर सेल यांचा **"नोव्हेंबर महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-३ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि. श्री. राहुल राख**